



दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३६८ वा मंगळवार दि १९ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये


# जागा राष्ट्रवादीची डोळा भाजपचा, पुण्यात महायुतीत रस्सीखेच; सुनेत्रा पवारांसमोर पेच, पार्थ यांचा निकटवर्तीयही शर्यतीत....

वृत्तसंस्था/पुणे

केंद्रीय निवडणूक आयोगाने अखेर विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक जाहीर केल्यामुळे पुण्यात राजकीय हालचालींचा वेग वाढला आहे. माजी आमदार अनिल भोसले यांची २०२२ पासून रिक्त राहिलेली पुण्याची ही जागा आपल्याकडेच राखण्यासाठी दिवंगत नेते अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सज्ज झाली आहे. मात्र, बदललेल्या राजकीय समीकरणात भारतीय जनता पक्षानेही या जागेवर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केल्याने महायुतीतच ङ्कपुण्याच्या जागेवरूनफ मिठाचा खडा पडण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर मतदारांचे संख्याबळ पूर्ण झाल्याने आयोगाने अखेर १८ जून रोजी मतदानाचा बिगुल वाजवला. या जागेवरून आता महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशा सामन्याऐवजी महायुतीत अंतर्गत सामना रंगण्याची जास्त चर्चा आहे. या मतदारसंघात पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य; तसेच पंचायत समिती सदस्य असे प्रमुख मतदार असतात. नुकत्याच पार पडलेल्या पालिका निवडणुकांमध्ये भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्याने स्थानिक पातळीवर भाजपचे पारडे जड मानले जात असल्याने दोन्ही पक्षांतील दिग्गज उमेदवारीसाठी सज्ज आहेत. महापालिकेत दीर्घ अनुभव असलेले गणेश बीडकर हे देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू मानले जातात. पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांवर आणि स्थानिक गणितांवर त्यांची मजबूत पकड असल्याने ते उमेदवारीसाठी मुख्य दावेदार आहेत. माजी आमदार जगदीश मुळीकही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. विधानसभा निवडणुकीत त्यांना विधान परिषदेचे आश्वासन दिले होते. ते पाळले जावे, यासाठी त्यांनी पक्षनेत्यांना साकडे घातले आहे. माजी आमदार सुनील टिंगरे, माजी महापौर योगेश बहल, माजी खासदार संजय काकडे यांचे चिरंजीव आणि खासदार पार्थ पवार यांचे निकटवर्तीय विक्रम काकडे उमेदवारी मिळवण्याच्या तयारीत आहेत. महायुतीच्या जागावाटपात ही जागा अजित पवार गटाला सोडायची, की भाजपने स्वतः कडे घ्यायची, यावरून वरिष्ठ पातळीवर मोठी रस्सीखेच होणार आहे. अनिल भोसले निवडून आले, तेव्हा ही अखंड राष्ट्रवादी होती. मात्र, आता अजित पवार महायुतीत आहेत. त्यातच पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या




निवडणुकीत भाजपने दणदणीत विजय मिळवून चांगले संख्याबळ मिळवले आहे. या संख्याबळाचा विचार करता भाजप आणि ङ्कराष्ट्रवादीफ मतदार समसमान आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यापुढे पहिलाच पेचप्रसंग उपस्थित होणार आहे. अजित पवार हयात असते, तर कदाचित हा प्रश्न उपस्थित झाला नसता.

# विवाहित बॉयफ्रेण्डसाठी सेल्सगर्लची ज्वेलरी शॉपमध्ये चोरी, १.६६ कोटींचे दागिने लंपास, आंघोळ करताना विश्वासघात अन् गेम पालटला

वृत्तसंस्था/ अहमदाबाद

एक प्रेम प्रकरण, ज्वेलरच्या दुकानातील धाडसी चोरी आणि हॉटेलच्या खोलीत झालेला विश्वासघात नव्या आयुष्याची सुरुवात करण्याच्या उद्देशाने ज्या कामाला सुरुवात केली, तिचा शेवट मात्र विपरित झाला. ज्वेलरी शॉपची सेल्सवुमन आणि तिच्या प्रियकराला तुरुंगाची हवा खावी लागली, विशेष म्हणजे चोरीला गेलेले बहुतांश दागिने अजूनही गायब आहेत. अहमदाबाद शहरातील निकोल भागात एका दागिन्यांच्या शोरूममधून १.६६ कोटी रुपयांचे सोने आणि हिऱ्यांचे दागिने चोरल्याचा आरोप असलेल्या एका सेल्सवुमनला गुन्हे शाखेने अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हर्षिदा शेट्टी हिने आपल्या विवाहित प्रियकरासोबत पळून जाऊन संसार थाटण्यासाठी ही चोरी केली होती. तपास अधिकाऱ्यांनी सांगितलं की, ११ मे रोजी निकोल येथील अनमोल सर्कलजवळ असलेल्या ग्रॅव्हिटी शॉपिंग मॉलमधील एका दागिन्यांच्या शोरूममध्ये ही चोरी घडली. शोरुमचे मालक दर्शन शाह यांनी सुमारे ११ महिन्यांपूर्वी हर्षिदाला सेल्सगर्ल म्हणून कामावर ठेवले होते. पोलिसांच्या माहितीनुसार, ११ मे रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास एका ग्राहकाने शोरुमला भेट दिली असता ही चोरी उघडकीस आली. त्यावेळी कर्मचारी कांजी पटेल यांच्या लक्षात आलं की, एका ट्रेमधून सोन्याचं नाणं गायब झालं आहे. त्यांनी मालक दर्शन शाह यांना याविषयी माहिती दिली. त्यांनी कांजी यांना सांगितलं की, हर्षिदाने काही वैयक्तिक काम असल्याचे सांगत लवकर निघण्याची परवानगी मागितली होती, परंतु आपण ती दिली नव्हती. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हर्षिदाने मालकाच्या दुपारच्या जेवणाच्या सुट्टीचा फायदा घेऊन ही चोरी केल्याचा संशय सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीतून खरा ठरला. नेहमीप्रमाणेच काम करत असल्याचा आव आणून, तिने अत्यंत पद्धतशीरपणे डिस्प्ले ट्रे आणि कपाटांमधून सोनसाखळ्या, अंगठ्या, लॉकेट्स आणि मंगळसूत्रे काढून घेतली. दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास शोरुममधून बाहेर पडण्यापूर्वी तिने हा मौल्यवान ऐवज




आपल्या ब्लेझर, युनिफॉर्म आणि बॅगेमध्ये लपवून ठेवल्याचा आरोप आहे. चोरीनंतर हर्षिदा प्रियकरासह अहमदाबादला पळून गेली. मिळालेल्या माहितीनुसार, या दोघांनी चोरलेले दागिने आणि रोख रक्कम वापरुन उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये प्रवास केला, हॉटेल्स आणि थंड हवेच्या ठिकाणी मुक्काम केला. मात्र त्यांच्या एका हॉटेलमधील मुक्कामादरम्यान दोघांच्या नात्याला एक नाट्यमय वळण लागल्याचा आरोप आहे.

# भाजपचे आता मिशन पंजाब!

अहोरात्र राजकारण करणाऱ्या भारतीय जनता पक्षानं पश्चिम बंगाल दणदणीतपणे सर केल्यानंतर पुढच्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकांची तयारी प्रचंड वेगानं सुरू केली आहे. २०२७ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूरसोबत पंजाबमध्येही विधानसभा निवडणुका होतील, असं दिसतं. भाजप च्या मुख्यालयात त्यामुळे या राज्यांतल्या नेत्यांची वर्दळ वाढलीय. उत्तर प्रदेशात भाजपला चिंता करण्यासारखी परिस्थिती सध्या तरी नाही. त्यामुळेच कदाचित भाजप नेतृत्वाचं विशेष लक्ष पंजाबकडं आहे. पश्चिम बंगाल, पंजाबसारखी सीमावर्ती राज्यं आपल्या अधिपत्याखाली आणणं हे सामरिकदृष्ट्याही भाजपला आवश्यक वाटत असणार. पंजाब हे पारंपरिकदृष्ट्या भाजपचं राज्य नाही. मागच्या विधानसभा निवडणुका, २०२४ची लोकसभा निवडणूक आणि पोटनिवडणूक यांत पंजाबात भाजपला यश मिळवता आलं नाही. मात्र यश मिळालं नाही म्हणून प्रयत्न सोडून देणाऱ्यांतला सध्याचा भाजप नाही. बंगालपेक्षा जास्त संवेदनशील असलेल्या पंजाबसारख्या राज्यांत सत्तेचा कलश हाती ठेवण्यासाठी भाजपनं आपली एकेक शस्त्रं धारदार करण्यास सुरुवात केली आहे. विशेष मतदारयादी पुनरावलोकन (एसआयआर) ही वादग्रस्त प्रक्रिया पंजाबातही सुरू होत आहेच. भाजप २०२७ च्या पंजाब विधानसभेच्या सर्व ११७ जागांवर निवडणूक लढवील, असं पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी सांगितलं, पण सत्तेत येण्यासाठी मार्ग कोणताही चालेल, असंच धोरण आहे. इतर राज्यांप्रमाणेच पंजाबातही भाजपनं इतर पक्षांमधले नाराज प्रमुख नेते आपल्याकडे ओढण्यास सुरुवात केली आहे. मागच्याच महिन्यात आपचे राज्यसभेतले सात खासदार आणि इतर ज्येष्ठ नेते भाजपमध्ये सामील झाले. त्यातील राघव चड्ढा यांना पंजाबच्या पुढच्या मुख्यमंत्रिपदाची स्वप्नं पडू लागल्याचं सांगितलं जातं. बंगाल, आसाम, बिहारमध्ये भाजपनं आयारामांना मुख्यमंत्रिपदाचा मुकुट सोपवला हे पाहता चड्ढा यांची कथित महत्त्वाकांक्षा अगदीच स्वप्नवत नसणार. दुसरीकडं पंजाबातही ईडी आणि ङ्गसीबीआयफ्सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप मुख्यमंत्री भगवंत मान यांनी थेट राष्ट्रपतींच्या दरबारापर्यंत पोहोचवला; पण दिल्लीत आलेले मान यांचा चेहरा भर दुपारीही जसा ध्यानमग्न दिसत होता, ते पाहता स्वतः केजरीवाल यांनाच पंजाबात प्रचारात मध्यवर्ती भूमिका करणं अपरिहार्य ठरेल. सोशल मीडियावरची प्रसिद्धी आणि राजकीय डावपेचांत पारंगत होत चाललेले चड्ढा आणि सांख्यिकी साधनांच्या माध्यमातून तळागाळातील संघटना उभारण्यात अनुभवी असलेले संदीप पाठक यांची २०२२ च्या पंजाब निवडणुकीतील आपच्या विजयात मोठी भूमिका होती. चड्ढा-पाठक यांनी राज्यसभेत ङ्गआपफ्ला खिंडार पाडलं त्याच सुमारास त्यांच्या एका जवळच्या सहकाऱ्यानं पंजाबमधील ङ्गआपफ्च्या नेत्यांना फोन करण्याचा सपाटा लावून एक प्रस्ताव मांडायला सुरुवात केल्याचं वृत्त आहे. पाठक ङ्गआपफ्च्या नेत्यांना आणि आमदारांना वैयक्तिकरीत्या ओळखतात आणि त्यांनी त्यांना मार्गदर्शनही केले आहे. मग प्रसंगी आपल्या या मार्गदर्शकाची आज्ञा पंजाबतले आप आमदार कशी टाळणार, असा सवाल राजकीय वर्तुळात विचारला जातो, त्यात तथ्यही आहे. प्रश्न हा आहे की, पंजाबसाठी भाजपची रणनीती पश्चिम बंगालसारखीच असेल की वेगळी? सहा वर्षांनंतर भाजप आणि शिरोमणी अकाली दल पुन्हा एकत्र येतील का? भाजप पंजाबमध्ये आपली संघटना मजबूत करून शहरी मतदारांबरोबरच दलित, ओबीसी आणि तरुण मतदारांमध्येही आधार वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. पंजाबात भाजपला स्वतंत्रपणे सत्ता मिळवण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. अकाली दल किंवा इतर प्रादेशिक शक्तींशी युती करायची की नाही, हा निर्णय अखेरीस केंद्रीय नेतृत्वाच्याच हातात असेल. भाजपनं पंजाब सर करणं याला बंगालमध्ये वाढलेल्या प्रभावाइतकंच वेगळं महत्त्व असेल. साहजिकच भाजपचं ङ्गमिशन पंजाबफ आता अधिक वेगानं पुढं सरकत आहे. पंजाब जिंकणं अवघड असलं तरी अशक्य नाही, हे भाजपला स्थानिक स्वराज्य संस्था आणि शहरी भागांतील वाढत्या प्रभावातून दिसू लागलं आहे. त्यामुळेच भाजप नेतृत्वानं भविष्यात विनोद तावडे, तरुण चुघ यांसारख्या संघटनात्मक नेत्यांना पंजाबात अधिक सक्रिय भूमिका दिल्यास आश्चर्य नाही. बिहारच्या नव्या सम्राट चौधरी मंत्रिमंडळातील ३१ पैकी जवळपास ४८ टक्के मंत्र्यांवर गुन्हे दाखल असून, त्यापैकी २९ टक्के मंत्र्यांवर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. ९० टक्के मंत्री कोट्यधीश आहेत आणि त्यांच्याकडील मालमत्ता प्रत्येकी सरासरी साडेसहा कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. सध्याच्या भाजपला यात गैर वाटत नाही. राजकारणात कोणी भजन-कीर्तन करायला आलेलं नसतं, हे नितीन गडकरींसारख्या भाजपमधील ज्येष्ठांचं सत्यकथन लक्षात घेतलं तर फक्त निवडणुका जिंकण्यासाठी भाजप (वाट्टेल ते) करतं ते वाईट आणि इतरांनी तेच केलं तर तो राजकारणाचा भाग, असा दुटप्पीपणा काँग्रेससह विरोधक किती काळ करणार आणि तो जनतेला कळत नसेल असा शहामृगी पवित्राही किती काळ घेणार हे प्रश्न उपस्थित होणंही स्वाभाविक. असं करून अपेक्षित काही साध्य होत नाही हे लक्षात येऊनही विरोधकांना जाग कशी येत नाही? एकच चूक पुन:पुन्हा केली की ती गुन्हा ठरते हा सर्वमान्य सिद्धान्त राजकारणाला लागू होत नाही असे कसे होईल?




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ‘व्हीआयपी संस्कृती’ला थारा नाही! मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी हटवला खुर्चीवरचा पांढरा टॉवेल

**चेन्नई/वृत्तसंस्था**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि ‘तमिळगा वेत्री कळघम’ (TVK) पक्षाचे प्रमुख जोसेफ विजय यांनी आपल्या कृतीतून एक नवा आदर्श घालून दिला आहे. एका पर्यावरणवादी कार्यकर्तीच्या आवाहनाला मान देत, मुख्यमंत्री विजय यांनी सरकारी कार्यालयांमधील ब्रिटिशकालीन ‘व्हीआयपी संस्कृती’ला (VIP Culture) मूठमाती दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर वर्षानुवर्षे ठेवला जाणारा पारंपारिक पांढरा टॉवेल विजय यांनी हटवला असून, त्यांच्या या निर्णयाचे सोशल मीडियावर जोरदार स्वागत होत आहे.

प्रसिद्ध पर्यावरणवादी कार्यकर्ती लिसिप्रीया कांगुजम (Licypriya Kangujam) हिने गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘X’ (ट्विटर) वर तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांना एक आवाहन केले होते. सरकारी कार्यालयांमध्ये मंत्र्यांपासून ते अगदी कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्याच खुर्च्यांवर पांढरा टॉवेल ठेवण्याची एक जुनी प्रथा आहे. ही ‘टॉवेल संस्कृती’ व्हीआयपी मानसिकतेचे प्रतीक असून ती बंद करण्यात यावी, अशी मागणी लिसिप्रीयाने केली होती. विजय यांनी स्वतःपासून सुरुवात करून हा बदल घडवून आणावा, असे तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटले होते. या आवाहनानंतर अवघ्या २४ तासांच्या आत मुख्यमंत्री विजय



यांनी कोणतीही अधिकृत घोषणा किंवा प्रसिद्धी न मिळवता शांतपणे आपल्या खुर्चीवरून तो पांढरा टॉवेल हटवला.

या बदलाबद्दल मुख्यमंत्री कार्यालय किंवा तामिळनाडू सरकारकडून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही. मात्र, नुकत्याच झालेल्या शासकीय बैठकांच्या फोटोंमधून हा मोठा बदल समोर आला आहे.

**१४ मे रोजीची बैठक :** सचिवालय येथे झालेल्या उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री विजय हे नेहमीप्रमाणे पांढरा टॉवेल असलेल्या पारंपारिक व्हीआयपी खुर्चीवर बसलेले दिसले होते.

**१५ मे रोजीची बैठक :** मात्र, शुक्रवारी ‘TAFE’ कंपनीच्या अध्यक्षा मल्लिका श्रीनिवासन आणि उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मी वेणू यांच्यासोबत झालेल्या बैठकीचे फोटो समोर आले, तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवरचा तो पांढरा टॉवेल गायब होता.

“सामान्य जनतेचा आवाज ऐकणारा मुख्यमंत्री”, अशा शब्दांत लिसिप्रीया कांगुजम हिने विजय यांचे आभार मानले आहेत. सोशल मीडियावरील नेटकऱ्यांनीही हा नोकरशाही आणि राजकारणातील ‘व्हीआयपी’ थाट मोडीत काढणारा एक ऐतिहासिक आणि प्रतीकात्मक बदल असल्याचे म्हटले आहे.

### विजयकडून निर्णयांचा धडाका

अभिनेते ते नेते बनलेल्या विजय यांनी १० मे रोजी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यांच्या ‘टीव्हीके’ (TVK) पक्षाने विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून यश मिळवले असून, काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. सत्ता हातात येताच घेतलेल्या निर्णयांमुळे विजय यांनी आपण ‘सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री’ असल्याचा संदेश दिला आहे.

### काय आहे या ‘पांढऱ्या टॉवेल’चा इतिहास?

भारतातील सरकारी कार्यालयांमध्ये अधिकाऱ्यांच्या आणि मंत्र्यांच्या खुर्चीवर पांढरा टॉवेल टाकण्याची प्रथा ही ब्रिटिशकालीन (Colonial Era) गुलामगिरीची आणि वर्गभेदाची आठवण करून देणारी आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश अधिकारी आपल्या केसांची रचना नेटकी ठेवण्यासाठी ‘मॅकॅसर ऑइल’ (Macassar oil) नावाचे एक तेल वापरायचे. खुर्चीच्या महागड्या लेदरला किंवा लाकडाला हे तेल लागून डाग पडू नयेत, म्हणून खुर्चीच्या वरच्या भागावर कापड ठेवले जायचे. पुढे भारताच्या उष्ण हवामानामुळे या कापडाची जागा पूर्ण पांढऱ्या टॉवेलने घेतली, जेणेकरून घाम शोषला जावा.

## देशभरात महामार्ग बांधणीचा वेग का मंदावला?

**पुणे/वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेला ‘बिटुमिन’चा तुटवडा, वाढलेल्या किमती आणि मंत्रिमंडळ समित्यांच्या मंजुरीअभावी रखडलेल्या प्रकल्पांमुळे देशातील महामार्ग बांधणीचा वेग मंदावल्याची कबुली केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

गडकरी यांनी संतशिरोमणी तुकाराम महाराज पालखी महामार्गाची पाहणी केली. या दरम्यान ‘लोकसत्ता’शी संवाद साधताना पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेला बिटुमिनचा तुटवडा आणि मंदावलेल्या महामार्ग बांधणीवरही भाष्य केले.

महामार्ग उभारणीचे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मात्र, महामार्ग बांधणीचा वेग आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रतिदिन २५ किलोमीटरवर आला असून, त्यात सलग तीन वर्षांपासून घसरण होत असल्याकडे लक्ष वेधले असता गडकरी म्हणाले, ‘प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामध्ये (एनएचएआय) तीन हजार कोटी रुपये आवश्यक आहेत. आता निधीसाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाकडे पाठवावा लागतो. त्यासाठी तीन ते चार समित्या असतात. त्यांच्याकडून परवानगी मिळाल्यानंतर प्रकल्प मंजूर व्हायला वेळ लागतो. त्यामुळे काही प्रमाणात महामार्ग बांधणीचा वेग मंदावला, हे खरे आहे. मात्र, हे सगळे प्रकल्प एकदम मंजूर होतील आणि महामार्ग बांधणीचा वेगही पूर्ववत होईल.’ युद्धामुळे बिटुमिनचा तुटवडा निर्माण झाला असून, त्याच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे महामार्गांच्या कामाचा वेग संथ होण्याबरोबर रस्त्यांची बांधणी आणि दुरुस्तीच्या कामांचा खर्च वाढत आहे. याबाबत गडकरी म्हणाले, ‘देशात महामार्ग विकासासाठी ११० लाख टन पेट्रोलियम बिटुमिनची गरज लागते. आता देशामध्ये बायो बिटुमिन बनविण्याला परवानगी देण्यात आली आहे. तांदूळ, कापूस आदी जैविक कचऱ्यापासून बिटुमिन निर्मितीसाठी संशोधन करण्यात आले. या संशोधनामुळे देशातील पहिला बायो बिटुमिनचा १ किलोमीटर लांबीचा रस्ता नागपूर ते जबलपूर महामार्गावर तयार झाला.

## विदेशात प्रवास करण्यासाठी आता टॅक्स लागणार?

**नागपूर/वृत्तसंस्था**

पंतप्रधान मोदी यांनी काही दिवसांपूर्वी विदेशात प्रवास करण्याचे किंवा पर्यटन करणे टाळावे, असे आवाहन केले होते. एका वृत्त संकेतस्थळाने याबद्दल वृत्तांकन करताना सरकार विदेश प्रवासावर कर लावण्याचा विचार करत असल्याचे म्हटले होते. मात्र ही बाब खरी नसल्याचे स्वतः पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले आहे. शुक्रवारी रात्री पंतप्रधान मोदींनी या बातमीची पोस्ट शेअर करत त्यावर ही धादांत खोटी माहिती असल्याचे सांगितले.

पंतप्रधान मोदींनी रात्री एस्कवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, “ही बातमी पूर्णपणे चुकीची आहे. यात तसूभरही सत्य नाही. विदेशातील प्रवासावर निर्बंध आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.” तसेच त्यांनी भारतीय नागरिकांसाठी व्यवसायात सुलभता आणि जीवनात सुलभता आणण्याच्या केंद्र सरकारच्या वचनबद्धतेवरही जोर दिला.

पंतप्रधान मोदींच्या स्पष्टीकरणानंतर आता सदर वृत्त संकेतस्थळाने माफी मागितली असून आपले वृत्त मागे घेतले आहे. विदेशातील प्रवासावर संभाव्य निर्बंध आणि अतिरिक्त कराबाबत अफवा पसरू नये, यासाठी पंतप्रधान मोदी यांनी स्वतः हस्तक्षेप करत हे वृत्त नाकारले. मध्यपूर्वेतील तणावामुळे अर्थव्यवस्थेवर येत असलेला तणाव आणि इंधनाच्या वाढत्या किमतीमुळे सदर बातमीमुळे उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. भारत कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो.



मध्यपूर्वेतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आला आहे. यामुळे भारतासह जगभरात इंधन तुटवड्याचा सामना करावा लागत आहे.

पंतप्रधान मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. शुक्रवारी त्यांनी संयुक्त अरब अमिरातीच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा केली. मध्यपूर्वेतील तणाव त्यातून विस्कळीत झालेला इंधन पुरवठा यावर भारताची ऊर्जा सुरक्षा बळकट करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीबरोबर सामरिक पेट्रोलियम साठ्यांसंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. भारत सरकारमधील सूत्रांनी सांगितले की, या नव्या करारामुळे ऊर्जा सहकार्य अधिक दृढ होईल आणि भारताकडे कच्च्या तेलाचा अधिक पुरवठा होईल.

## ‘पाकिस्तानवर उपकार...’ अमेरिकेने इराणसोबत युद्धविराम का केला? ट्रम्प यांचा खुलासा!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेले युद्ध ८ एप्रिल रोजी थांबले. या युद्धबंदीमागे पाकिस्तानची मध्यस्थी कारणीभूत असल्याचा खुलासा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. ‘एअर फोर्स वन’ विमानात पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, इराणसोबत युद्धबंदी करण्याची त्यांची इच्छा नव्हती, परंतु पाकिस्तानचा शब्द राखण्यासाठी आणि त्यांच्यावर एकप्रकारे उपकार म्हणून अमेरिकेने हा निर्णय घेतला. ट्रम्प यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान आणि फील्ड मार्शल यांचे कौतुक केले असून इराणला अण्वस्त्र तयार करू न देण्याचा इशारा दिला आहे.

इराणसोबत करण्यात आलेल्या युद्धबंदीमागे पाकिस्तानची मध्यस्थी कारणीभूत असल्याचा खुलासा ट्रम्प यांनी केला आहे. “इराणसोबत युद्धबंदी करण्याची



माझी अजिबात इच्छा नव्हती, पण पाकिस्तानचा शब्द राखण्यासाठी आणि त्यांच्यावर एकप्रकारे उपकार म्हणूनच आम्ही हा निर्णय घेतला,” असा खळबळजनक खुलासा ट्रम्प यांनी केला आहे. यासोबतच, इराणवर आता नव्याने कोणताही बॉम्बहल्ला केला जाणार नसल्याचे स्पष्ट करत ट्रम्प यांनी आखातातील तणाव काहीसा कमी करण्याचे संकेत दिले आहेत.

चीनचा दौरा आटोपून अमेरिकेकडे परतत असताना ट्रम्प यांनी ‘एअर फोर्स वन’ या राष्ट्राध्यक्षांच्या अधिकृत विमानात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ट्रम्प म्हणाले- “आम्ही केवळ एका दुसऱ्या देशाच्या विनंतीचा मान ठेवून ही युद्धबंदी मान्य केली आहे. खरं तर मी या निर्णयाच्या बाजूने नव्हतो, पण पाकिस्तानवर उपकार म्हणून आम्ही हे पाऊल उचलले. पाकिस्तानचे पंतप्रधान आणि फील्ड मार्शल हे दोघेही अत्यंत उत्तम व्यक्ती आहेत.” अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी रोजी थेट युद्धाला सुरुवात झाली होती. त्यानंतर पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवल्यानंतर, ८ एप्रिलपासून हे हल्ले थांबवण्यात आले होते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या अणू कार्यक्रमाबाबत आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. “इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्र तयार करू दिली जाणार नाहीत. तेहरानने (इराणची राजधानी) युरेनियमचा नाद सोडला पाहिजे,” असा सज्जड दम ट्रम्प यांनी दिला. इराणने पाठवलेला शांतता प्रस्ताव आपण पहिल्याच वाक्यात फेटाळून लावल्याचेही ट्रम्प यांनी सांगितले. आपला अणू कार्यक्रम पूर्णपणे बंद करण्याबाबत इराणने या प्रस्तावात कोणतीही ठोस हमी दिली नव्हती, त्यामुळे अमेरिकेने हा प्रस्ताव नाकारला. इराणसोबत प्रदीर्घ काळ चाललेल्या या संघर्षामुळे ट्रम्प काहीसे राजकीय दबावात असतानाच चीन दौऱ्यावर गेले होते. मात्र, चीनकडून इराणच्या मुद्द्यावर कोणताही मोठा तोडगा काढण्यात त्यांना यश आले नाही. बीजिंगमधील ‘झोंगनानहाई गार्डन’ येथे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेबाबत बोलताना ट्रम्प म्हणाले, “आम्ही इराणच्या समस्येवर सविस्तर चर्चा केली. या समस्येचा कसा तोडगा काढायचा, याबाबत आमच्या दोघांचे विचार बरेच सारखे आहेत. इराणकडे अण्वस्त्रे नसावीत आणि ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’ (होर्मुझची सामुद्रधुनी – जागतिक तेल व्यापाराचा मुख्य सागरी मार्ग) वाहतुकीसाठी खुली राहावी, यावर आमचे एकमत आहे.”

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिथं पत्नी अन् दोन मुलांना गमावलं, तिथंच मृत्यूला कवटाळलं; कोल्हापुरात धक्कादायक..

**कोल्हापूर/वृत्तसंस्था**

नोव्हेंबर 2023 मध्ये गोव्याहून मुंबईकडे जाणारी खासगी आराम बस पिरवाडी-पुईखडी घाटात उलटल्याने झालेल्या भीषण अपघात झाला होता. या अपघातात आपली पत्नी आणि दोन लहान मुलांना गमावल्यानंतर पुण्यातील रहिवासी विराट विठ्ठललाल गौतम (वय 58, रा. मांजरी बुद्रुक, पुणे) हे गृहस्थ आपल्या कुटुंबात एकटेच बचावले होते. मात्र यानंतरचा काळ पूर्णपणे नैराश्यात गेल्यामुळे त्यांनी देखील आपल्या कुटुंबाला गमावल्यानंतर जवळपास अडीच वर्षांनी त्याच अपघातस्थळी आत्महत्या करून आपले जीवन संपवले. ही धक्कादायक घटना कोल्हापुरातील राधानगरी रोडवर पुईखडी घाटात उघडकीस आली आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी घाटात काही वाहनधारकांना रस्त्यापासून काही मीटर अंतरावर आतमध्ये एक मृतदेह अगदी सडलेल्या अवस्थेत आढळून आला. सदर व्यक्तीच्या मृतदेहाजवळ काही पिशव्या आणि इतर साहित्य दिसल्याने त्यांनी करवीर पोलीस ठाण्याला याबाबत



माहिती दिली. घटनास्थळी दाखल झालेल्या करवीर पोलीस निरीक्षकांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. व्यक्तीच्या खिशातील ओळखपत्रावरून ते पुण्यातील विराट गौतम असल्याचे स्पष्ट झाले. प्राथमिक तपासात ही घटना आत्महत्या असावी, अशी शक्यता व्यक्त करत पोलिसांनी पूर्णपणे सडलेल्या अवस्थेतील मृतदेह शवविच्छेदनासाठी पुढे पाठवला. अंतिम अहवालानंतरच मृत्यूचे अधिकृत कारण जाहीर होणार आहे.23 नोव्हेंबर 2023 रोजी गोव्याहून मुंबईकडे जाणारी खासगी स्लीपर बस (MH12 TV 1658) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी रोडवरील पिरवाडी-पुईखडी घाटातील वळणावर उलटली होती. त्या दुर्घटनेत पुणे येथील मांजरी बुद्रुक परिसरातील विराट यांची पत्नी नीलू विराट गौतम (वय 43), मुलगी रिद्धिमा गौतम (वय 17) आणि मुलगा सार्थक गौतम (वय 13) यांचा जागीच मृत्यू झाला होता. त्या वेळी विराट हे जखमी अवस्थेत बचावले होते. या घटनेत एकूण 25 प्रवासी बसमध्ये होते; तीन जणांचा मृत्यू झाला आणि बाकीचे जखमी झाले होते. करवीर पोलिसांनी त्या अपघातात बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर दोन वर्षांपासून विराट यांचे जीवन अत्यंत दुःखदायी राहिले होते. पोलिस आणि नातेवाईकांच्या माहितीनुसार, ते नियमितपणे पिरवाडी घाटात येऊन तिथे तीन पुष्पहार ठेवून कुटुंबीयांना श्रद्धांजली वाहत असत. स्थानिकांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, विराट हे 10 मे रोजी पुन्हा पिरवाडी घाटात आले होते; त्यांना तेथे फिरताना काही व्यक्तींनी पाहिले होते. मात्र, नंतर त्याच ठिकाणी दुर्दैवीरीत्या त्यांचा मृतदेह आढळला.आपलं आयुष्य संपवण्याआधी देखील त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट टाकली होती. "आज कोल्हापुरात देहत्याग केला आहे. मी कसा जगत आहे हेच मला कळत नाही. या जगात काही माणसे अशी असतात, ज्यांच्याशिवाय जगणे खूप कठीण असते. ते गेल्यावर मी कसा जगत आहे, हाच प्रश्न मला पडतो. माझे जग त्याच क्षणी संपले. नीलू, रशिका, सर्विलशिवाय मी अडीच वर्षे कसा जगलो, हे मला समजत नाही." अशा आशयाची पोस्ट त्यांनी केली होती.

करवीर पोलिसांकडून दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी सापडलेले सर्व पुरावे तपास अधिकाऱ्यांकडे नोंदवण्यात आले आहेत. शवविच्छेदन अहवाल, सोशल मीडिया पोस्ट आणि त्यांच्या व्यक्तिगत वस्तूंच्या आधारे पुढील तपासात अधिक तपशील लवकरच उघड होण्याची शक्यता आहे. या घटनेने कोल्हापूरसह पुण्यातील त्यांच्या कौटुंबिक वर्तुळात अत्यंत दारुण शोककळा पसरली असून, अशा दुःखात असलेल्या व्यक्तींना वेळेत मानसिक आरोग्य सेवा आणि मानसिक सहाय्य मिळावे यावर सध्या चर्चा सुरू झाली आहे.

## पदरात 2 लेकरं, बायको घर सोडून गेली; कौटुंबिक कलहातून पतीचा टोकाचा निर्णय

**नागपूर/वृत्तसंस्था**

पत्नीच्या सततच्या मानसिक त्रासाला आणि कौटुंबिक कलहाला कंटाळून ३४वर्षीय पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना वाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. याप्रकरणी वाडी पोलिसांनी मृत तरुणाच्या पत्नीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.मनीष देवानंद देशभ्रतार (वय ३४, रा. रघुपतीनगर, वाडी) असे मृत पतीचे नाव असून, पूजा देशभ्रतार असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपी पत्नीचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, मनीष आणि पूजा यांचा बारा वर्षांपूर्वी प्रेमविवाह झाला. त्यांना दोन मुले आहेत. सुरुवातीला सुखात चाललेल्या त्यांच्या संसारात मागील काही दिवसांपासून सतत खटके उडत होते. पत्नी पूजा ही इतर व्यक्तींशी फोनवर बोलत असल्याच्या संशयावरून दोघांमध्ये अनेकदा मोठे भांडण व्हायचे. काही दिवसांपूर्वी हा वाद टोकाला पोहोचला. १४ मार्च रोजी पूजा ही प्रणय नावाच्या एका तरुणासोबत घर सोडून निघून गेली. मनीष यांनी तिचा शोध घेत तिला विजयवाडा येथून परत आणले. मात्र, नागपूरला परतल्यानंतर ती पुन्हा आपल्या माहेरी निघून गेली. मनीष यांनी तिला समजवण्याचा प्रयत्न केला. परंतु, तिने आपल्या दोन्ही मुलांची जबाबदारी घेण्यासही स्पष्ट नकार दिला.पत्नी घर सोडून जाणे आणि मुलांची जबाबदारी घेण्यास नकार दिल्याने मनीष तीव्र मानसिक तणावाखाली होते. पत्नीकडून मिळणाऱ्या या सततच्या मानसिक त्रासाला कंटाळून अखेर २० एप्रिल रोजी मनीष यांनी रघुपतीनगर येथील आपल्या राहत्या घरी सीलिंग फॅनला दोरीने बांधून गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेनंतर वाडी पोलिसांनी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. मात्र, पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली असता, मृत मनीष यांच्या आई कविता देशभ्रतार यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. आईच्या तक्रारीवरून वाडी पोलिसांनी आरोपी पत्नी पूजाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

## २९ वर्षीय तरुणीने इमारतीवरून झोकून दिलं; उच्चशिक्षित मुलीच्या मृत्यूने कुटुंबाला मोठा धक्का....

**नाशिक/वृत्तसंस्था**

वडाळा गावाजवळील काद्री एम्पायर इमारतीच्या नवव्या मजल्यावरून उडी मारून २९ वर्षीय उच्चशिक्षित तरुणीने आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (दि. १६) दुपारी घडली. बुशरा अंजुम शेख असे मृत तरुणीचे नाव असून, तिच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. याबाबत मुंबई नाका पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.शेख कुटुंब गेल्या सहा महिन्यांपूर्वीच खडकाळी भागातून काद्री एम्पायरमधील नवव्या मजल्यावरील सदनिकेत भाडेत्वाने वास्तव्यास आले होते. बुशरा हिचे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले असून, सध्या तिच्या विवाहासाठी स्थळ पाहण्याचे काम सुरू होते. शनिवारी (दि. १६) दुपारी मुशराने अचानक घरातून खुर्ची आणली आणि बाल्कनीची खिडकी उघडून थेट खाली स्वतःला झोकून दिले. घरात उपस्थित असलेल्या तिच्या वडिलांनी तिला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, मुशराची ओढणीच त्यांच्या हाती आली आणि ती थेट नवव्या मजल्यावरून खाली कोसळली. यात तिचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच मुंबई नाका पोलिसांनी धाव घेतली. तरुणीने टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण पोलिस शोधत आहेत. एकीकडे तरुणीने जीवन संपवल्याची घटना घडलेली असताना दुसरीकडे नाशिक शहरातील आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. नवीन





घरात सुख-समृद्धी नांदण्यासाठी आयोजित केलेल्या वास्तूशांती सोहळ्यादरम्यान एक दुर्दैवी घटना घडली. रो-हाउसच्या गच्चीवर फिरत असताना अचानक तोल गेल्याने एका व्यक्तीचा खाली पडून मृत्यू झाला. ही घटना पंचवटी परिसरातील दिंडोरीरोडवरील 'संस्कृती रो-हाउस' येथे घडली. काशिनाथ गौड (वय ५५, रा. मऊ, उत्तर प्रदेश) असे मृताचे नाव आहे. काशिनाथ गौड हे नातेवाइकांच्या नवीन घराच्या वास्तूशांतीसाठी नाशिकमध्ये आले होते. गुरुवारी (दि.१४) रात्री वास्तूशांतीचे सर्व विधी झाल्यानंतर काशिनाथ हे रो-हाउसच्या गच्चीवर झोपण्यासाठी गेले होते. शुक्रवारी (दि.१५) सकाळी पावणेसातच्या सुमारास ते गच्चीवर फिरत असताना अचानक तोल जाऊन ते खाली कोसळले.

## हॉटेलमधून पार्टी करुन बाहेर निघाले, नुकतीच ओळख झालेल्या व्यक्तीचा घरी सोडण्याचा बहाणा; पुण्यात धावत्या कारमध्ये महिलेवर अत्याचार

**पुणे/वृत्तसंस्था**

पुण्यातील मुंढवा येथील कोरेगाव पार्क परिसरात एक संतापजनक घटना समोर आली आहे. पुण्यात चालत्या कारमध्ये महिलेवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. मध्यरात्री एका हॉटेलमध्ये पार्टीसाठी आलेल्या महिलेला घरी सोडण्याच्या बहाण्याने कारमध्ये लैंगिक अत्याचाराची ही घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रात्री पार्टीत ओळख झालेल्या एका इसमाने घरी सोडतो म्हणून कारमध्ये नेलं आणि अत्याचार केला. पुण्यातल्या प्रसिद्ध कोरेगाव पार्क परिसरातील एका हॉटेलमधून महिला आणि पुरुष बाहेर पडले होते. या महिलेची आणि पुरुषाची ओळख पार्टीमध्ये झाली होती, त्यानंतर घरी सोडण्याच्या बहाण्याने या नराधमाने पीडित महिलेवर धावत्या कारमध्ये अत्याचार केला आहे. कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेनं पुण्यात पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. तर काही दिवसांपूर्वीच पुण्यातील भोर जिल्ह्यातील नसरापूरमध्ये चिमुकलीवर अत्याचार करून हत्या केल्याची





घटना ताजी असतानाच कोरेगाव पार्कमध्ये घडलेल्या या महिलेवरील अत्याचाराच्या घटनेमुळे संताप व्यक्त होत आहे. तर गेल्या काही दिवसांमध्ये गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.पुण्यात नेमकं चाललंय काय? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक पोलीस प्रशासनाला आणि सरकारला विचारत आहे. चिमुकल्या मुली असो किंवा विवाहित महिला असो, यांना घराच्या बाहेर पडणं देखील मुश्कील झालं आहे.

म्हणजे, नसरापूर प्रकरणाला महिनाही उलटला नाही तोवर ही अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. या घटनांना कधी आळा बसेल? पोलिसांचा धाक आता गुन्हेगारीत क्षेत्रात उरलेला नाहीय का? सर्वसामान्यांसोबत जे काही घडतंय, त्याला कोण न्याय देणार? असा प्रश्न आता जनसामान्यातून पुढे येत आहे.

# हैदराबादने सीएसकेला घरच्या मैदानावर लोळवलं, पॉइंट टेबलमध्ये तीन संघ क्वालिफाय

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६ मधील ६३ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायजर्स हैदराबाद संघामध्ये पार पडला. सीएसकेचा घरच्या मैदानावर हैदराबाद संघाने ५ विकेटने हरवले. या सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये १८०-७ धावा केल्या होत्या. सीएसकेकडून डेवाल्ड ब्रेविस याने २७ चेंडूत सर्वाधिक ४४ धावा केल्या. त्यासोबतच कार्तिक शर्माने ३२ धावांची खेळी केली. पिच स्लो असल्याने खेळाडूंना मोठे फटके खेळताना अडचण येत होती. मात्र हैदराबादकडून इशान किशन याने ७० धावांची खेळी करत विजयाच पाया रचला. त्यासोबतच क्लासेनची २७ चेंडूत ४७ धावांची खेळी करत सामना फिरवला. या विजयासह सनरायजर्स हैदराबाद संघाने अंतिम चारमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. त्यासोबतच आता पॉइंट टेबलमध्ये आता तीन जागा निश्चित झाल्या आहेत. आरसीबी, गुजरात आणि हैदराबाद हे तीन संघ प्ले ऑफसाठी पात्र ठरले आहेत. आता चौथ्या स्थानासाठी पंजाब, चेन्नई आणि राजस्थानमध्ये लढाई होणार आहे.सीएसके संघाकडून सलामीला संजू सॅमसन आणि ऋतुराज गायकवाड उतरले



होते. संजूने आक्रमण सुरू केले होते, त्यामुळे सीएसके आज मोठी धावसंख्या उभारणार असे सर्वांना वाटत होते. परंतु कमिन्सने संजूला २७ धावांवर आऊट करत पहिला धक्का दिला. त्यानंतर आलेल्या उर्विल पटेल याने दोन षटकार मारत दमदार सुरूवात केली पण साकिब हुसेन याने त्याला बोल्ड केले. कार्तिक शर्माने सूत्रे आपल्या हातात घेतली आणि आक्रमण सुरू ठेवले. परंतु ऋतुराज गायकवाड संथ गतीने खेळत असल्याने दुसऱ्या फलंदाजांवर त्याचा दबाव पाहायला मिळाला.या दबावामध्ये धावसंख्या वाढवण्याच्या नादात कार्तिक शर्मा ३२ धावांवर आऊट झाला. त्यानंतर ऋतुराजही कॅच आऊट झाला. २१ चेंडू खेळताना त्याने फक्त १५ धावा केल्या. कसोटी क्रिकेटसारख्या स्ट्राईक रेटने त्याने धावा केल्या विशेष म्हणजे त्याने एकही चौकार किंवा षटकार मारला नाही. डेवाल्ड ब्रेविसने ४४ धावा करत सीएसकेची गाडी पुढे नेली त्यानंतर शिवम दुबे यानेही २६ धावा केल्या पण संघाला २०० धावांपर्यंत पोहोचू शकला नाही.

कॅप्टन पॅट कमिन्सने सर्वाधिक तीन विकेट आणि साकिब हुसेन याने दोन विकेट घेतल्या.सनरायजर्स हैदराबादकडून सलामीला अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड उतरले होते. ट्रॅव्हिस हेडला मुकेश कुमार याने ६ धावांवर माघारी पाठवले. त्यानंतर अभिषेकही २६ धावांवर परतला होता. मात्र क्लासेन आणि इशान किशन यांनी ४१ चेंडूत ७५ धावांची भागीदारी करत सामना खेचला. पण क्लासेन ४७ धावांवर असताना आऊट झाला. मात्र इशान किशन हा एकटा मैदानात लढत होता. थकला होता पण त्याने ४७ चेंडूत ७० धावांची खेळी करत सामना हैदराबादच्या पारड्यात टाकला. सलील अरोरा आणि स्मरण रवीचंद्रन यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.

## शिट्टी वाजवत फॅन्सची उडवली खिल्ली

■ चेपॉक/वृत्तसंस्था

सनरायझर्स हैदराबादचा यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशनने सीएसकेविरुद्ध सामना जिंकून देणारी खेळी केली. त्याने चेपॉक स्टेडियमवर 70 धावा केल्या. खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल नसतानाही, हैदराबादने 6 चेंडू शिल्लक असताना 5 गडी राखून विजय मिळवला. या विजयामुळे संघाने प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित केले. तर चेन्नईच्या प्लेऑफच्या आशा मावळल्या आहेत. मॅच संपवल्यानंतर इशान किशनचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे.सामन्यानंतर, दोन्ही संघांतील खेळाडू एकमेकांशी हस्तांदोलन करत होते. यादरम्यान, इशानने चेपॉक स्टेडियममधील प्रेक्षकांकडे पाहून शिट्टी वाजवली. 'व्हिसल पोडू' ही सीएसकेची अधिकृत घोषणा आहे. त्याने प्रेक्षकांना घरी जाण्याचा इशाराही केला. त्यानंतर त्याने प्रेक्षकांना हात हलवून 'कम ऑन, एसआरएच!' अशी घोषणा दिली. याचा व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे. इशानच्या या वागण्यामुळे प्रेक्षक त्याच्यावर रागवले आहे.181 धावांचे लक्ष्य गाठताना हैदराबादची सुरुवातही खराब झाली. तिसऱ्या षटकात ट्रॅव्हिस हेडने बाद केल्यानंतर इशान किशन क्रीजवर आला. आठव्या षटकात 56 धावांवर अभिषेक शर्माची विकेटही पडली. इशान किशनने एक बाजू सांभाळली आणि त्याला हेनरिक क्लासेनने साथ दिली. 41 चेंडूंमध्ये तिसऱ्या विकेटसाठी 75 धावा जोडून या दोघांनी संघाचा विजय जवळपास निश्चित केला होता.हैदराबादला शेवटच्या 14 चेंडूंमध्ये 23 धावांची गरज होती. इशान किशनने अंशुल कंबोजविरुद्ध एक चौकार आणि एक षटकार मारून 12 चेंडूंमध्ये धावसंख्या 13 धावांवर आणली. या सामन्यात इशान किशनने 47 चेंडूंचा सामना करत 7 चौकार आणि 3 षटकारांसह 70 धावा केल्या. तो 19व्या षटकात बाद झाला आणि त्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर संघाने विजय मिळवला.

## भाऊ आहेस तू माझा ! रैनाला मैदानात कॉमेट्री करताना पाहिल्यावर महेंद्र सिंग धोनीने पाहा काय केलं ?

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएलमध्ये पार पडलेल्या चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायजर्स हैदराबादमधील सामन्यात ५ विकेटने सीएसकेचा पराभव झाला. चेन्नईच्या संघाचा घरच्या मैदानावरील अखेरचा सामना होता. सीएसकेने पहिल्यांदा बॅटिंग करताना १८०-७ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना सनरायजर्स हैदराबाद संघाने १९ ओव्हरमध्येच आव्हान पूर्ण केले. इशान किशन




याने ७० धावांची खेळी करत हैदराबादच्या संघाला जिंकवून दिले. सामना संपल्यावर सर्व संघ प्रेक्षकांना त्यांनी दिलेल्या पाठिंब्यासाठी त्यांचे आभार मानत होता. संपूर्ण ग्राऊंडच्या बाजूने महेंद्र सिंग धोनीसह चालत होते. यादरम्यान सीएसकेचा माजी खेळाडू सुरेश रैना हा कॉमेट्री करताना तिथे मैदानाच्या बाजूला उभा होता. धोनीला तो दिसला त्यावेळी धोनी सर्व गर्दी सोडून आपल्या जुन्या भिडूला भेटण्यासाठी गेला.दोघे कट्टर मित्र, सीएसकेचे दोन मॅचविनर ज्यांनी सीएसकेला जिंकवलेल्या पाच विजतेपदांमध्ये मोलाची भूमिका बजावली होती. धोनीकडे भारतीय संघाची सूत्रे असताना सुरेश रैना आणि दोघांची जोडी मैदानात दिसायची. जवळपास दोन दशके गाजवलेल्या धोनीसोबत रैनाही अनेक वर्ष सावलीसारखा उभा असायचा. धोनीच्या अनुपस्थितीत रैनाकडे भारतीय संघाच्या कर्णधारपदाची सूत्रे दिली होतीत. रैना इतका कट्टर की ज्या दिवशी धोनीने निवृत्ती जाहीर केली त्याचवेळी काही वेळात त्यानेही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून आपल्या निवृत्तीची घोषणा केली होती. त्यामुळे धोनी आणि रैना खूप स्पेशल होते. आता रैना निवृत्त झाला असून कॉमेट्री करतो, मात्र आपला दोस्त दिसताच धोनीची पाऊले एवढ्या गर्दीमध्ये त्याच्या दिशेने वळलीत.यंदाच्या हंगामामध्ये महेंद्र सिंग धोनी एकही सामना खेळला नाही. सीएसके संघाचा आज घरच्या मैदानावर अखेरचा सामना होता, त्यामुळे चाहत्यांना आशा होती की धोनी आजच्या सामन्यात खेळताना दिसेल. पण असे काही झाले नाही, त्यामुळे चाहत्यांचीही निराशा झाली.

## तिलक वर्माला डेट करायला माझ्या श्रीलीलाकडे वेळ नाही, ती 'नीट 'ची तयारी करतेय, आईने अफवा उडवून लावल्या

■ मुंबई)/वृत्तसंस्था

अभिनेत्री श्रीलीला आणि क्रिकेटपटू तिलक वर्मा हे गेल्या काही काळापासून एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना सध्या उधाण आलं आहे. या अफवांबाबत या दोघांनीही मौन बाळगलं असलं, तरी श्रीलीलाच्या आईने मात्र यावर स्पष्टीकरण देताना यामध्ये काहीही तथ्य नसल्याचं सांगितलं आहे."या अफवा पूर्णपणे खोट्या असून यामध्ये यत्किंचितही तथ्य नाही" असं डॉ. स्वर्णलता यांनी 'डेक्कन क्रॉनिकल'ला सांगितलं. "अशा प्रकारच्या बातम्या कशा आणि कुठून पसरतात, हे आम्हालाच समजत नाही. श्रीलीला आणि तिलक वर्मा हे गेल्या वर्षभरापासून एकमेकांना भेटत आहेत किंवा डेट करत आहेत, असं सांगणाऱ्या बातम्यांमध्ये तीळमात्रही सत्य नाही. या केवळ काल्पनिक





गोष्टी आहेत."तिलक वर्मा आणि श्रीलीला यांच्यातील प्रेमसंबंधांच्या (डेटिंगच्या) चर्चा सर्वप्रथम गेल्या वर्षी समोर आल्या होत्या. डिसेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या 'वैकुंठ एकादशी'च्या उत्सवादरम्यान, श्रीलीलाने तिची आई डॉ. स्वर्णलता यांच्यासह 'श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरा'ला भेट दिली होती; आणि त्याच सुमारास तिलकही आपल्या कुटुंबासह तिथे उपस्थित होता, असे सांगितले जाते.या दोन्ही घटना निव्वळ योगायोग होत्या आणि त्या पलिकडे त्यात काहीच नव्हतं" असं श्रीलीलाची आई म्हणाली. "मात्र सोशल मीडिया अनावश्यकपणे संबंध नसलेल्या घटनांवरुन नको त्या कहाण्या रचत असते, जे पूर्णपणे अनुचित आहे." असंही त्या म्हणाल्या. चर्चेत आणखी भर घालणारी आणखी एक घटना वानखेडे स्टेडियमवर झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या सामन्यादरम्यान घडली; या सामन्याला श्रीलीलाने उपस्थिती लावली होती आणि यावेळी तिच्या टीममधील एका सदस्याने तिलक वर्माशी संबंधित असलेली जर्सी परिधान केल्याचं पाहण्यात आलं होतं. तिलक वर्मा देशांतर्गत क्रिकेटमध्ये हैदराबादचे प्रतिनिधित्व करतो आणि आयपीएलमध्ये 'मुंबई इंडियन्स'कडून खेळतो, तर श्रीलीला प्रामुख्याने तेलुगू चित्रपटसृष्टीत कार्यरत आहे. तिने 'भगवंत केसरी' आणि 'पुष्पा २' सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. अनुराग बसू यांच्या एका रोमँटिक चित्रपटात कार्तिक आर्यनच्या नायिकेच्या भूमिकेतून ती हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं भव्य पदार्पण करणार आहे.श्रीलीलाच्या आगामी महिन्यांतील प्लॅनविषयी बोलताना तिच्या आईने सांगितले, "जूनमध्ये नियोजित असलेल्या 'नीट' परीक्षेची ती तयारी करत आहे. सध्या तिचं संपूर्ण लक्ष केवळ अभ्यास आणि चित्रपटांवर केंद्रित आहे. अशा प्रकारच्या वैयक्तिक बाबींसाठी तिच्याकडे अजून पाच ते सहा वर्षांचा कालावधी आहे. कोणालाही डेट करायला तिच्याकडे वेळ नाही. ती आपला अभ्यास व करिअर या दोन्ही गोष्टींचा समतोल अतिशय उत्तम प्रकारे राखत आहे."

# पोटगीबाबत मौनी रॉयच्या नवऱ्याचे स्पष्टीकरण, दोघांत तिसरा आल्याच्या दाव्यांवरही खुलासा

काही दिवसांपूर्वीच अभिनेत्री मौनी रॉयने पती सूरज नांबियारपासून विभक्त होत असल्याची घोषणा केली. तेव्हापासून तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक गोष्टींवर चर्चा सुरु आहे. लग्नाच्या चार वर्षांनंतर या जोडप्याने एकमेकांपासून घटस्फोट घेतला आहे. त्यांच्या घटस्फोटामागील कारणांविषयी अनेक दावे केले जात आहेत. बऱ्याच ठिकाणी या दोघांमध्ये तिसरा आल्याचेही म्हटले गेले. मात्र, आता सूरज नांबियारने या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे.सूरज नांबियारने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक सविस्तर पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये त्याने स्पष्टपणे नमूद केले की, त्याच्या आणि मौनीच्या घटस्फोटामध्ये ना कोणत्याही प्रकारच्या पोटगीचा समावेश आहे, ना आमच्यात कोणी तिसरं आलं आहे. सूरज नांबियारने लिहिले: "आमच्या विभक्त होण्याबाबतच्या अलीकडील निराधार बातम्या अत्यंत विचित्र पद्धतीने मांडल्या गेल्या आहेत. या अफवा पूर्णपणे दुष्ट हेतूने पसरवल्या गेल्या आहेत. मला एकदाच सत्य स्पष्ट करायचे आहे की आमच्या घटस्फोटामध्ये कोणत्याही पोटगीचा प्रश्न नाही. आमच्यात कोणताही कटुभाव नाही. आणि यात कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीचा सहभाग नाही."सूरजने पुढे म्हटले: "मौनी आणि मी, एकमेकांचा आदर ठेवून आणि एकमेकांच्या हिताचा पूर्णपणे विचार करून, परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. आणि हेच सत्य आहे. याव्यतिरिक्त इतर जे काही आमच्याबाबत म्हटले जातेय, ते पूर्णपणे मनाने रचलेल्या गोष्टी आहे; आणि काही प्रसंगी, तर तो दोन व्यक्तींना बदनाम करण्याचा हेतुपुरस्सर केलेला प्रयत्न आहे. यापलीकडे यात काहीही नाही.सूरज नांबियार पुढे लिहिले, "मला हे स्पष्टपणे आणि अगदी शेवटचे सांगायचे आहे की, आमच्या दोघांविषयी किंवा कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीविषयी जे काही दावे केले जात आहेत, त्यामध्ये काहीही तथ्य नाही. या प्रकरणामध्ये इतर लोकांना ओढणे योग्य नाही.





विशेषतः त्या 'निर्दोष मित्रांना', ज्यांचा या बाबीशी काडीमात्रही संबंध नाही. मौनी आणि मी, या संपूर्ण काळात अत्यंत सन्मानपूर्वक वागलो आहोत; आणि आम्हाला आशा आहे की, अशा प्रकारची चर्चा करणारे लोकही आमच्याशी तितक्याच सन्मानाने वागतील."शेवटी सूरजने लिहिले: "माध्यमांमधील अनेक वृत्तांमध्ये अशा काही कथा रचल्या गेल्या, ज्यांचा वास्तवाचा कोणताही आधार नव्हता. ही वृत्ते कोणत्याही प्रकारच्या पडताळणीशिवाय प्रकाशित करण्यात आली आहेत, जे अत्यंत अनुचित आहे. मी ही बाब स्पष्टपणे आणि थेट मांडत आहे; कारण जाणीवपूर्वक पसरवल्या जाणाऱ्या या चुकीच्या माहितीसमोर गप्प बसणे मला मान्य नाही. आमच्या संयुक्त निवेदनात जे काही सांगणे आवश्यक होते, ते सर्व काही समाविष्ट होते. मी सर्वांना विनंती करतो की, त्यांनी या गोष्टीचा आदर करावा आणि आम्हा दोघांनाही आमच्या आयुष्यात शांतपणे पुढे जाण्याची संधी द्यावी. धन्यवाद."सूरज नांबियारने आपल्या निवेदनात कोणाचेही नाव घेतले नसले, तरी त्याने "निर्दोष मित्रांचा" (innocent friends) उल्लेख केला आहे. त्याने हे दिशा पाटनीला उद्देशून म्हटले असल्याचा अंदाज अनेकांनी बांधला. घटस्फोटाच्या चर्चा सुरू असतानाच, मौनीची जवळची मैत्रीण आणि अभिनेत्री दिशा पटानीला सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर 'ट्रोल' केले गेले होते. या प्रकारामागे इतर कोणी नसून खुद्द मौनीचेच चाहते होते. अनेक युझर्सनी तर असाही दावा केला की, दिशाने इन्स्टाग्रामवर सूरज नांबियारला 'अनफॉलो' केले आहे.

## माधुरीचा फ्लॉप चित्रपट, सुपरस्टार देखील झाला फेल, 3 वेळा रडले दिग्दर्शक, माधुरीवर झालेला आरोप...

बॉलिवूडमध्ये एक काळ असा होता की अभिनेत्री माधुरी दीक्षितचे नावच चित्रपट हिट होण्यासाठी पुरेसे मानले जात होते. 90 च्या दशकात तिचे स्टारडम शिखरावर होते. 'तेजाब', Hum Aapke Hain Koun..!, Saajan यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमधून तिने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. मोठमोठे निर्माते-दिग्दर्शक तिच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवत होते. मात्र एका चित्रपटाच्या अपयशाने प्रसिद्ध दिग्दर्शक राकेश रोशन यांना मोठा धक्का बसला होता.1997 साली प्रदर्शित झालेला 'कोयला' हा चित्रपट राकेश रोशन यांनी दिग्दर्शित आणि निर्मित केला होता. या चित्रपटात शाहरुख खान आणि माधुरी दीक्षितची जोडी पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर झळकली होती. चित्रपटावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला होता आणि तो बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई करेल, अशी अपेक्षा होती.मात्र चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. 'कोयला' बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करू शकला नाही आणि तो अपेक्षेपेक्षा कमी यशस्वी ठरला. या अपयशामुळे राकेश रोशन यांना आर्थिक आणि मानसिक दोन्ही प्रकारचा फटका बसल्याचे सांगितले जाते.राकेश रोशन यांचा मुलगा आणि अभिनेता हृतिक रोशनने एका मुलाखतीत 'कोयला'च्या अपयशानंतर वडिलांची अवस्था कशी झाली होती, याबद्दल खुलासा केला होता. त्याने सांगितले की, या चित्रपटात मोठी गुंतवणूक करण्यात आली होती आणि चित्रपट अपेक्षेप्रमाणे चालला नाही.

ऋतिकच्या मते, या अपयशानंतर राकेश रोशन खूप भावूक झाले होते. त्यांनी आयुष्यभराची कमाई चित्रपटात गुंतवली होती. काही आर्थिक व्यवहारांमध्येही नुकसान झाल्यामुळे त्यांना मोठा धक्का बसला होता. ऋतिकने सांगितले की, वडिलांच्या डोळ्यांत अश्रू आले होते आणि हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळ होता.माध्यमांतील काही रिपोर्टनुसार, राकेश रोशन यांनी 'कोयला'च्या अपयशासाठी अप्रत्यक्षपणे माधुरी दीक्षितला जबाबदार धरल्याची चर्चा होती. त्यांनी कथितरित्या असे म्हटले होते की, प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी माधुरीची प्रतिमा त्या वेळी पुरेशी प्रभावी ठरली नाही. ही टिप्पणी सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली होती.



मात्र या वक्तव्यामुळे माधुरी दीक्षितच्या चाहत्यांमध्ये नाराजी पसरली होती. विशेष म्हणजे त्याच वर्षी माधुरीला Dil To Pagal Hai या चित्रपटासाठी फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळाला होता.

## 'देऊळ बंद' पाहून साक्षात दिसतील स्वामी

प्रवीण तरडेंचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'देऊळ बंद २' चा अखेर ट्रेलर समोर आला आहे. ज्यात तुम्हाला साक्षात स्वामींचे दर्शन होत असल्याचा अनुभव मिळतो. अंगावर काटा आणणारा ट्रेलर सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे. 'देऊळ बंद २'मध्ये शेतकरी स्वामींची परीक्षा घेताना दिसणार आहे. त्यामुळे चित्रपटाची टॅग लाइन 'देऊळ बंद २- आता परीक्षा देवाची' अशी आहे.

'देऊळ बंद २' चित्रपटात एका महिला शेतकऱ्याची कथा दाखवण्यात आली आहे, जी स्वामींचीच परीक्षा घेते. चित्रपटाचा मुख्य हेतू शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना आळा घालणे हा आहे. आत्महत्या करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाहीत, तर बदलत्या परिस्थितीनुसार शेतीत बदल करण्याची गरज आहे, असा ठाम संदेश या चित्रपटातून दिला जाणार आहे.

'देऊळ बंद २' च्या ट्रेलरमध्ये खूपच सुंदर डायलॉग पाहायला मिळत आहे. 'देशात सगळं ओरिजनल, डुप्लिकेट फक्त शेतकरी...', '१० दिवसांत एक जरी आत्महत्या झाली तर माझं देऊळ बंद!', 'मी तुमचं अस्तित्व मान्य करेन पण, तुम्ही आधी परीक्षा द्या...' असे खूप सुंदर डायलॉग पाहायला मिळतात, जे थेट काळजाला भिडतात. तसेच ट्रेलरमध्ये स्वामी शेतकरी महिलेसोबत प्रवास करताना, तिच्याशी बोलताना दिसत आहेत. शेतात, दऱ्याखोऱ्यांमध्ये, एसटीने स्वामी आणि शेतकरी महिला प्रवास करतात.

'देऊळ बंद' चित्रपटाचा पहिला भाग २०१५ मध्ये प्रदर्शित झाला होता. 'देऊळ बंद -2' चित्रपट २१ मे रोजी थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. 'देऊळ बंद -2'मध्ये ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी श्री स्वामी समर्थांची भूमिका साकारणार आहेत. चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शन प्रवीण तरडे यांनी केले आहे. महिला शेतकऱ्याच्या भूमिकेत स्नेहल तरडे दिसणार आहे. हा प्रवास खूपच खास ठरणार आहे.

'देऊळ बंद -2' चित्रपटात प्रवीण तरडे, स्नेहल तरडे आणि मोहन जोशी यांच्यासोबत अनेक तगडे कलाकार पाहायला मिळणार आहेत. महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, देवेंद्र गायकवाड,रमेश परदेशी,ओम भूतकर, सुनील अभ्यंकर, संस्कृती बालगुडे, मुकुंद वसुले, अतुल कुदले, अनिरुद्ध दिंडोरकर आणि हृषीकेश वांबुरकर हे कलाकार झळकणार आहेत.

## १०० कोटी क्लबमध्ये एन्ट्री, १० वर्षांनी मोडला 'सैराट'चा रेकॉर्ड

रितेश देशमुखचा ड्रीमप्रोजेक्ट 'राजा शिवाजी' चित्रपटानं १०० कोटींच्यावर कमाई केली आहे. प्रदर्शित झाल्यापासूनच या चित्रपटानं प्रेक्षकांना थिएटर्सकडे खेचून आणले असून, आता हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील आजवरचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे.गेल्या १० वर्षांपासून नागराज मंजुळे यांच्या 'सैराट' (९० ते १०० कोटी) चित्रपटाचा असलेला रेकॉर्ड मोडीत काढत 'राजा शिवाजी'नं अवघ्या तीन आठवड्यांत बॉक्स ऑफिसवर आपली विजयाची पताका फडकवली आहे.तिसऱ्या वीकेंडलाही प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाल्यामुळं राजा शिवाजी चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली आहे.






निर्मात्यांनी अधिकृत दिलेल्या माहितीनुसार, चित्रपटाची आतापर्यंतची एकूण कमाई १०० कोटींच्यावर कमाई केलीय.राजा शिवाजी सिनेमानं भारतात ९३.१० कोटींच्यावर कमाई केली आहे. तर चित्रपटानं परदेशात ४.९० कोटींचा गल्ला जमवलाय. तर एकूण कमाई ही ११४ कोटींच्या घरात कमाई केली. महाराष्ट्र दिनाचं (१ मे) औचित्य साधून रिलीज झालेल्या या चित्रपटानं पहिल्याच दिवशी ११.३५ कोटींची ऐतिहासिक ओपनिंग केली होती. पहिल्याच आठवड्यात चित्रपटानं ५७.७० कोटींचा गल्ला जमवला होता.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आयुष्यावर आधारित असलेला हा भव्य चित्रपट मराठीसोबतच हिंदी भाषेतही प्रदर्शित करण्यात आला होता. महाराष्ट्रात मराठी सिनेमाला तर पसंती मिळालीच, पण हिंदी व्हर्जनलाही प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला. उत्तम 'वर्ड ऑफ माउथ' आणि भव्य निर्मितीमूल्यांमुळे या चित्रपटाला प्रेक्षक पुन्हा पुन्हा पाहण्यासाठी गर्दी करत आहेत.या चित्रपटाचे आणखी एक मोठं वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये अभिषेक बच्चन,संजय दत्त, सलमान खान यांसारख्या दिग्गज कलाकारांची तगडी स्टारकास्ट आहे. रितेश देशमुखनं नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितलं होतं की, महाराजांच्या चरणी सेवा म्हणून या चित्रपटातील बऱ्याच मोठ्या कलाकारांनी कोणतंही मानधन न घेता काम केलं आहे. तसंच अनेक बॉलिवूड कलाकार या सिनेमात झळकले आहेत.हा सिनेमा रितेश देशमुखसाठी अनेक कारणामुळं खास ठरला आहे. या सिनेमात देशमुख कुटुंबातील अनेक सदस्यांनी अभिनय केलाय. रितेश देशमख, जिनिलिया देशमुख , त्यांची दोन मुलं रियान आणि राहिल यांनीही सिनेमात अभिनय केलाय. तसंच रितेशचे बंधू धीरज देशमुख हे देखील सिनेमातील एका गाण्यात झळकले आहेत.

# तृतीयपंथीयांसाठी बीजभांडवल योजना;३० मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहनस्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध

जनसंचलन बुलढाणा

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील किमान दहा वर्षे वास्तव्यास असलेल्या तृतीयपंथीय व्यक्तींच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी राज्य शासनाने बीजभांडवल योजना मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत भाजी स्टॉल, चहा-स्नॅक्स सेंटर, झेरॉक्स-लॅमिनेशन सेंटर, फ्रुट स्टॉल, पिठाची गिरणी, कापडी पिशव्या तयार करणे, जनरल स्टोअर्स, स्टेशनरी शॉप, मालवाहतूक टेम्पो, आईसक्रिम फॅक्टरी, वडा-पाव व ज्युस सेंटर, बेकरी व्यवसाय, बांगडी दुकान, बटाटा वेफर्स निर्मिती, ब्युटी पार्लर, सलून, चिकन-मासे विक्री केंद्र, मोबाईल शॉपी, मसाले तयार करणे तसेच लाँड्री व्यवसायासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच प्रशिक्षित तृतीयपंथीय व्यक्तींना प्लंबर, फ्रिज दुरुस्ती, इलेक्ट्रिशियन, टीव्ही दुरुस्ती, मोबाईल दुरुस्ती, स्मार्ट खेळणी तयार करणे, ए.सी. दुरुस्ती, गॅस शेगडी दुरुस्ती, घरगुती उपकरणे दुरुस्ती, वॉटर हिटर, गिझर व वॉटर फिल्टर दुरुस्ती यांसाठी आवश्यक साधनसंच खरेदीकरिता देखील कर्ज उपलब्ध होणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक तृतीयपंथीय व्यक्तींनी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, बुलढाणा येथे अर्ज प्राप्त करून तो दि. ३० मे २०२६ पर्यंत सादर करावा, असे आवाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे




ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी १४२ विंधण विहिरी व २७ कुपनलिकांना प्रशासकीय मंजुरी

जनसंचलन/बुलढाणा

जल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने सन २०२५-२६ साठी ११७ गावांमध्ये १४२ विंधण विहिरी तसेच १९ गावांमध्ये २७ कुपनलिका मंजूर केल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय दि. ३ फेब्रुवारी १९९९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी सादर केलेल्या प्रस्तावांना संबंधित तहसीलदार, गट विकास अधिकारी तसेच सहाय्यक भूवैज्ञानिक आणि कनिष्ठ भूवैज्ञानिक यांनी पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन शिफारस केली होती. त्यानुसार चिखली, संग्रामपूर, लोणार, देऊळगाव राजा, बुलढाणा, जळगाव जामोद, मेहकर आणि नांदुरा तालुक्यातील गावांचा समावेश करण्यात आला आहे. संग्रामपूर तालुक्यात सर्वाधिक कुपनलिका मंजूर करण्यात आल्या असून दयालनगर, शिवनी, लोहगाव बु., करमोडा, मारोड यांसारख्या गावांमध्ये एकापेक्षा अधिक कुपनलिका मंजूर झाल्या आहेत. बुलढाणा तालुक्यात सागवण येथे ५ विंधण विहिरी, रायपूर व घाड येथे प्रत्येकी २ विंधण विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. मेहकर तालुक्यात गोमेघर येथे ४ तर वरवंड, पारखेड आणि अंजनी येथे प्रत्येकी २ विंधण विहिरी मंजूर झाल्या आहेत. लोणार तालुक्यातही अनेक गावांमध्ये विंधण विहिरींना मंजुरी देण्यात आली आहे. प्रशासनाने मंजूर कामांसाठी अटी व शर्ती लागू केल्या आहेत. कामे तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष टंचाई कालावधीत नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ग्रामीण पाणी पुरवठा विभागावर सोपविण्यात आली आहे. तसेच कामे सुरू करण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर पंचनामा करणे, जिओ टॅगिंग फोटो सादर करणे, खाजगी जागेवरील कामांसाठी दानपत्र घेणे आणि कामांच्या गुणवत्तेची खात्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, नव्या विंधण विहिरी सुरू करण्यापूर्वी नादुरुस्त हातपंप दुरुस्त करण्याच्या सूचनाही प्रशासनाने दिल्या आहेत. मंजूर कामे ३० जून २०२६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक असून मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास मंजुरी व्यपगत होणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

जनसंचलन बुलढाणा

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील भूमिहीन व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना १०० टक्के अनुदानावर शेतजमीन उपलब्ध करून देण्यासाठी ङ्कङ्क्कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनाफ्र राबविण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१५/ प्र.क्र.६४/अजाक, दिनांक १४ ऑगस्ट २०१८ अन्वये ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ४ एकर कोरडवाहू (जिरायती) जमीन कमाल प्रतिएकर ५ लाख रुपये किंमतीपर्यंत किंवा २ एकर ओलीताखालील (बागायती) जमीन कमाल प्रतिएकर ८ लाख रुपये किंमतीपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेसाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असणे आवश्यक असून तो दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन असावा. लाभार्थ्यांचे वय किमान १८ वर्षे व कमाल ६० वर्षे असावे. लाभार्थी निवडीत दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन परित्यक्ता महिला, विधवा महिला तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अत्याचारग्रस्तांना प्राधान्य देण्यात येणार आहे. शासन निर्णय दिनांक १४ मार्च २०१८ नुसार जिल्हास्तरीय समितीमार्फत जमीन खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रचलित रेडीरेकनर दरानुसार जमीन खरेदी करण्याचा प्रयत्न केला जाणार असून आवश्यकतेनुसार रेडीरेकनर दरापेक्षा अधिक किंमत देण्याची तरतूदही शासनाने केली आहे. मात्र, जिरायती जमिनीसाठी प्रतिएकर ५ लाख रुपये व बागायती जमिनीसाठी प्रतिएकर ८ लाख रुपये ही कमाल मर्यादा राहणार आहे. ासन मान्य दरानुसार जमीन शासनास विक्री करण्यास इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा यांच्या कार्यालयात दि. १२ जून २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गजानन बिडकर यांचा राज्यस्तरीय सत्कार; मूकनायक नॅशनल अवॉर्ड २०२६ ने सन्मानित.




**जनसंचलन बुलढाणा**

पत्रकारिता, समाजसेवा आणि जनजागृती क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पुरोगामी पत्रकार संघ (भारत) चे तेलंगणा राज्याध्यक्ष तथा साप्ताहिक महिमा खादीचा चे मुख्य संपादक गजानन गंगाधरराव बिडकर यांचा नांदेड येथे राज्यस्तरीय सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना प्रतिष्ठेचा ङ्कङ्कमूकनायक नॅशनल अवॉर्ड २०२६फ्फ जाहीर झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. दैनिक वीर शिरोमणी तसेच दैनिक व साप्ताहिक नंदगिरीचा कानोसा यांच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य समारंभात हा गौरव सोहळा पार पडला. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते श्री. बिडकर यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पहार प्रदान करून गौरविण्यात आले. गजानन बिडकर हे पत्रकारितेच्या माध्यमातून वंचित, पीडित आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध जनहिताच्या प्रश्नांना वाचा फोडत प्रभावी जनजागृती केली आहे. त्यांच्या निःस्वार्थ, ध्येयवादी आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत हा राष्ट्रीय सन्मान जाहीर करण्यात आला. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना गजानन बिडकर म्हणाले, ङ्कहा सन्मान केवळ माझा नसून सत्य, समाजहित आणि जनजागृतीसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या प्रत्येक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांचा आहे. हा पुरस्कार पुढील कार्यासाठी अधिक प्रेरणा देणारा ठरेल.फ्फ

धर्माबादयेथेजंगीस्वागतवविशेषसत्कार


नांदेड येथील सन्मानानंतर गजानन बिडकर यांनी धर्माबाद येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान साप्ताहिक नव्या युगाची वाटचाल चे मुख्य संपादक प्रेमसिंह इंदरसिंह चव्हाण आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संजय (बंटी) काडगेवार, सूर्यकांत हनमंते, समर्थ फोटो स्टुडिओचे संचालक सत्यनारायण पांचाळ तसेच पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. भेटीदरम्यान पत्रकारिता, सामाजिक कार्य, संघटन विस्तार, कौटुंबिक विषय तसेच समकालीन राजकीय घडामोडींवर सविस्तर चर्चा झाली. उपस्थितांनी गजानन बिडकर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. दोन राज्यांतील गौरवाचा दुहेरी आनंद महाराष्ट्रात राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराची घोषणा आणि तेलंगणात पत्रकार संघटनेचे राज्याध्यक्ष म्हणून प्रभावी नेतृत्व या दुहेरी गौरवामुळे गजानन बिडकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पत्रकारिता, समाजसेवा आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडविण्याचा त्यांचा संकल्प अधिक दृढ झाला असून, आगामी काळात त्यांच्या कार्याचा विस्तार अधिक व्यापक पातळीवर होईल, असा विश्वास विविध स्तरांतून व्यक्त केला जात आहे.

# कोरड्या विहीरीत पडलेल्या नंदीचे वाचविले प्राण एक कॉल प्रॉब्लम सॉल



**जनसंचलन/बुलढाणा**

गौ सेवेत सदैव अग्रेसर असलेल्या एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या गौ सेवकांनी वाचविले नंदीचे प्राण. सविस्तर माहिती अशी आहे की दिनांक १६ मे २०२६ रोजी सावजी ले आऊट स्थित उदासी बाबा मंदिर च्या पाठीमागील भागातील खुल्या प्लॉट मधील कोरडया विहिरीत एक नंदी जखमी अवस्थेत पडलेला होता घटनेची माहिती दिनांक १७ मे २०२६ रोजी सकाळी मिळताच सुरजभैय्या यादव हे काल सकाळी ८:५७ ला पोहचले व दोरीच्या साहाय्याने ते विहीरीत उतरले जखमी अवस्थेत पडलेल्या नंदीला दोरी बांधून आपला जीव धोक्यात घालून त्याचा रिस्कयु केला. विशेष तो नंदी जवळ कोणाला येऊ देत नव्हता भीती पोटी कोणीही विहीरीत जाण्याची हिम्मत करत नव्हता कारण की तो नंदी सरळ मुंडकं पुढं घेऊन सारखा मारायला अंगावर येत होता. शेवटी सुरजभैय्या यादव यांनी त्याच्यावर काबू मिळवत विहिरीतून काढून त्याची सुटका केली. या गौ सेवेत त्यांच्यासह एकनिष्ठा गौ सेवक संजय देशमुख, सचिन गायकवाड, पंकज राऊत, दारमोडे साहेब, रोहीत राऊत, पाटील साहेब, पाचपोर काका, भांबेरे साहेब, हर्षल इंगळे आदि लोकांनी नंदीचे प्राण वाचविण्यासाठी अथक मेहनत घेऊन त्याला जिवनदान दिले. अशी माहिती रविंद्र दिपके यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.




# डोणगावात जनगणनेसाठी लहान मुलांचा गैरवापर; शाळेतील शिक्षकाचा कारनामा

**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय कामांसाठी शिक्षकांची नियुक्ती केली जाणे नवीन नाही, परंतु डोणगाव येथे चक्क शाळकरी मुलांचा वापर जनगणनेच्या कामासाठी केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार आज सकाळी समोर आला आहे. यामुळे शैक्षणिक वर्तुळात आणि पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



आज दिनांक १९ मे रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास डोणगाव येथील कळसकरवाडी परिसरामध्ये घर गणना (जनगणना) सुरू होती. यावेळी एका शाळेवरील शिक्षक शाळेतील लहान मुलांना घर गणनेच्या कामाला लावल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८